Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-IX Sept. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# संत ज्ञानेश्वरांच्या गौळणीतील अध्यात्म व भक्तिभाव

**सर्जेराव हैबती शेटके**
न्यू कॉलेज, शिवाजी पेठ,
कोल्हापूर.

मध्ययुगीन मराठी साहित्यात संत वाङ्‌मय, पंडिती वाङ्‌मय व शाहिरी वाङ्‌मय हे त्रिविध प्रवाह ठळकपणे जाणवतात. यामध्ये संत साहित्याचा प्रवाह हा आपल्या अंगभूत गुणवैशिष्टयाने प्रभावित करणारा आहे. महाराष्ट्रातील लोकमानसावर संत साहित्याच्या अजरत्वाची, अमरत्वाची, अक्षरत्वाची आणि अभंगत्वाची छाप पडलेली आहे. बाराव्या–तेराव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यत संत साहित्याची अखंड निर्मिती होत राहिली. संत साहित्य निर्मिती मागील प्रेरणा पारलौकिक आध्यात्मिक स्वरुपाची आहे. हे सकृतदर्शनी जाणवते. हे असे असले तरी 'बुडती हे जन देखवे न डोळा' असा जनहिताचा कळवळाही आढळतो. तसेच जीवन विषयक चिंतन, तत्वचिंतन व तत्त्वविवरण हे कधी भाष्य ग्रंथाच्या, तर आध्यात्मिक प्रकरणांच्या, तर कधी स्वतंत्र तत्त्वविवेचनात्मक रुप घेताना संत साहित्य दिसते आणि आध्यात्मिक प्रेरणेतून संतांच्या आत्मपर, भावकवितेचा उगम झाला. तो कधी अभंगाच्या रुपाने, कधी गौळणीच्या, तर कधी विराण्यांच्या, तर कधी सौ–या या रुपात मधुराभक्तिपर लेखनाची रुपे साकार होताना दिसतात. त्यामध्ये गौळणी व विराण्या या आध्यात्मिक भक्तीचं एक लोभसवाणे रुप आहे. या रचनातून संत साहित्याने समाजजीवनही उजळून टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

विठ्ठलास कृष्ण समजून संत ज्ञानेश्वरांपासून ते तुकारांमापर्यतच्या अनेक संतश्रेष्ठीनी भक्तीचा जयघोष महाराष्ट्रात केला आहे. श्रीकृष्णाच्या लीलांचा स्वतंत्र गौरव त्यांनी केला आहेच. पण विठ्ठलाचे चिंतन, त्याचा ध्यास, त्यांचा विरह, त्यांच्याशी झालेले मिलन इ. भक्तीच्या छटा मराठी संतांच्या साहित्यात स्पष्ट रुपाने प्रकट झालेल्या दिसतात. आत्मिक अनुभव देणारे हे संत महात्मे कृष्ण भेटीस कसे आतूर झालेले असतात हे पाहण्यासारखे आहे. मराठीतील या स्वानुभवसंपन्न कृष्ण भक्तीस संतांनी फारच मनोहर स्वरुप प्राप्त करुन दिलेले आहे. आध्यात्मिक व पारमार्थिक तत्व निरुपण तर त्यांनी केलेच, पण भक्तिसाधना करताना विठ्ठलाच्या म्हणजेच कृष्णाच्या ऐक्याचे जे साक्षात्कार त्यांना झाले तेही त्यांनी प्रामाणिकपणे रसाळ भाषेत अभंगातून, गौळणीतून मांडले आहेत.

गौळण हे मराठीतील असेच एक रुपककाव्य आहे. अध्यात्माचा अर्थ शृंगाराच्या माध्यमातून सांगण्यासाठी कृष्णचरित्रातील लौकिक लोकजीवन रुपकांसाठी निवडले आणि कृष्णलीला गौळणीतून मांडली गेली. मराठी संतांना अध्यात्मालाच समाजात रुजवायचे होते. म्हणून भागवतात जसे श्रोते रंगून जातात तसेच गौळणीच्या शृंगारमिश्रीत अध्यात्मातही श्रोते रंगतील असे संतांना वाटले. राधा–कृष्णाच्या सर्वच लीला रसाळ. त्या लीलेला शृंगाराचा थोडा साज चढविला आणि मराठीतील गौळणी उदयास आल्या. म्हणून गौळण या काव्यप्रकाराचे शरीर जरी शृंगाराचे

असले तरी आत्मा अध्यात्माचा होता. गौळणीचा उत्कट भाव त्यात दडलेला होता. संत वाङ्मयाच्या भव्य प्रासादात गौळण हे एक शृंगारलेले दालन आहे. प्रेमभावनेने स्त्री रुप घेतले की तो शृंगाराचा स्थायीभाव होतो. संतांच्या गौळण वाङ्मयातून पुढे लोककलेतील गौळणी रचल्या गेल्या आणि गौळण या साहित्यप्रकाराला लोकप्रियता लाभली.

मराठी गौळण हा एक वैशिष्टपूर्ण गीतप्रकार असून कवीपरत्वे त्याच्या भिन्न–भिन्न छटा प्रकट झाल्या आहेत. वास्तविक मनाने आणि शरीराने परमेश्वराशी एकरुप होण्याच्या अवस्थेत त्रयस्थाचे भान असण्याची शक्यता नसते. ज्ञानेश्वरांची गौळण जनमनाशी संवाद साधणारी नसून ती मनमोहनाशी सुखसंवाद करते. ती त्याच्या मिलनाच्या कल्पनेने सुखावते. ती गौळण बाललीलात रमते. खोडयांनी कातावते. आत्मपीडनाच्या अनेकविध भावछटा ज्ञानेश्वरांची गौळण प्रकट करते. ही त्यांची एक प्रकारे आत्मरतीच आहे. ज्ञानेश्वरांची गौळण अनेकविध रुपे धारण करीत असली तरी तिचे आंतरिक रुप परमात्मवेडया ज्ञानेश्वरांचेच असते.

संत ज्ञानेश्वर हे काव्य व तत्त्वज्ञान यांचा सुरेख मेळ घालणारे तत्वज्ञ कवी होते. शृंगाराच्या माथा, पाय ठेवणा–या शांतरसाचा प्रभावी आविष्कार ज्ञानेश्वरांनी केला असला तरी इतर रसाचा यशोचित आविष्कारही केला आहे. ज्ञानेश्वरांच्या आयुर्मानाचा विचार करता त्यांनी स्त्री–पुरुष संबंधातील शृंगाराचे वर्णिलेले अनेकविध बारकावे त्यांच्या सूक्ष्म, मार्मिक निरीक्षणाची साक्ष पटवितात. लौकिकाचारात राहूनही अलौकिकत्व राखणा–या या थोर पुरुषाची तुलना स्थित प्रज्ञाशीच होण्यासाठी आहे. गुरु–शिष्यसंबंध किंवा परमेश्वर–भक्तसंबंधही हे याच भूमिकेवरुन त्यांची आत्यंतिक जवळीक आणि परस्परानुरक्ती दर्शविण्याकरिता, वल्लभाकांत स्वरुपात मांडतात. संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीत,

"आत्मज्ञानें चोखडी । संत जे माझी रुपडी ।
तेथ दृष्टि पडो आवडी । कामिनी जैसी ।।"

आत्माज्ञानाने निर्मळ झालेले हे संतजन माझ्याच लहान प्रमाणाच्या प्रतिमा आहेत. तेव्हा ज्याप्रमाणे कामुक स्त्री आपल्या पतीकडे आवडीने पाहते, त्याचप्रमाणे तुझी दृष्टी या संतांकडे आवडीने पाहो.

परमेश्वर मीलनातील आत्यंतिक उत्कटता मानवी शृंगार कल्पनेनेच अधिक प्रत्ययकारी होऊ शकते. अशी अनेक भक्तकवीची भावना आहे. परमेश्वर–भक्त संबंधात पतिव्रतेची एकनिष्ठता असते. या लौकिक संबंधाद्वारे अलौकिकाचे सूचन होते.

"अहेतूके चित्ते । अनुष्ठा पां ययाते ।
पतिव्रता पतीते । जियापरी ।।"

तुम्ही मनात कोणताही स्वार्थ न ठेवता या स्वधर्माचे अनुष्ठान करा. जशी पतिव्रता आपल्या पतीची आराधना एकनिष्ठेने व निष्कामबुद्धीने करते, तसा आपल्या मनात परमेश्वराविषयी भक्तिभाव असला पाहिजे. श्रीकृष्णाच्या खोडयांनी त्रासून गेलेल्या गौळणीची गा–हाणी सांगतानाही अध्यात्म येते. गौळणीचे प्रारंभीचे रुप संपूर्ण लौकिकांचे तर अंती तिला लाभलेले वळण पूर्ण पारलौकिकाचे असे. एकाच दोन समान पातळयांवरुन साकार आहे. संत ज्ञानेश्वर आपल्या

गौळणीतून आध्यात्मिक भक्तिभाव स्पष्ट करताना म्हणतात, भक्तिभावाने, भक्तिप्रेमाने माझ्याशी मिळणा—या गौळणी माझेच रुप पावतात असे भगवंतांनी सांगितल्याचे ज्ञानेश्वर स्पष्ट करतात.

श्रीकृष्णाच्या खोडयांनी त्रासून गेलेल्या गौळणींची गा—हाणी सांगतानाही अध्यात्म व भक्तिभाव पाहायला मिळतो.

"ऐसी पळत पळत गेलिये ।कान्होने मोहिलिये ।
माझी मीचि जालिये ।मग मी समोखिलिये गो ।।
पूर्वपूण्य फळले । देह मुक्त झाले ।
बापरखुमादेविवरु विठ्ठले । ऐसे केले गो आईया ।।"

या गौळणीतील शृंगार पूर्ण आशयाला आणि गा—हाणीला संत ज्ञानेश्वर अध्यात्म व भक्तिभाव यांची जोड देतात. श्रीकृष्णाच्या दर्शनाने माझेपण गळाले. मला पूर्व पुण्य मिळाल्यामुळेच माझ्यातील अहंकार, मीपणा भक्तिभावाने नाहीसा झाला आणि मी देहमुक्त झाले अशी भावना गौळण व्यक्त करते.

सगुणरुपातच आपल्या अध्यात्म व भक्तिभावाला, प्रेमभावाला बहर येतो. म्हणून सगुण रुपाचे ध्यान का करावे ? या विषयी संत ज्ञानेश्वर म्हणतात,

" हा जगडंबरु जगदाभासू । की ठसावला आभासु ।
नाभिकमळी प्रकाशू । चतुरानना ।।
पाहता तेथींची हाव । मना न पुरे तेथीची थाव ।
म्हणउनि सगुण ध्यान । करी तुझेगे माये ।।"

आम्हाला जगामध्ये एकदम तुझे रुप पाहणे जमत नाही आणि माझे मन तेवढे धावू शकत नाही. आम्हाला तुझ्या सगुणरुपाचा म्हणूनच आधार वाटतो. सर्व सामान्य भक्ताचा देखील हाच भक्तिभाव असतो. निर्गुणापर्यत त्याची झेप नसते आणि सगुणाचा मार्ग त्याच्यासाठी सुलभ असतो. संत ज्ञानेश्वरांच्या पुढील गौळणीतून उत्कट भक्तिभाव लक्षात येतो

"मज तुरंबा कांवो जिये जिये । जेणे वेधें हरि सोयरा होये ।
मज लावा कां वो चंदन ऐसिये परीचे ।जे लाविलियाचि अनादि पुसोनि जाये वो ।
मज शृंगारा कां वो तया जोगी । पुढती अंग न समाय अंगी ।
या मना पासोनी पठिये तो गोंवाळु । तोचि तो जिव्हारी भोगीनगे माये ।।
देह पालटा वो तयासाठी । वरच या देईन अवघी सृष्टी ।
बापरखुमादेविवरा विठ्ठलास योगी । तोचि तो त्यागुन भोगिये माये ।। "

संत ज्ञानेश्वर गौळणीतून अध्यात्म व भक्तिभाव व्यक्त करताना दिसतात. गोपीने साज शृंगार केला आहे. म्हणजे ती मनाने, विचाराने, भावनेने श्रीकृष्णाशी एकरुप होण्यासाठी 'साजशृंगार' केला आहे. असा साजशृंगार करुन श्रीकृष्णाच्या म्हणजेच परमेश्वरास सामोरे जाण्याची भक्ताची इच्छा, भक्तिभाव या गौळणीतून व्यक्त होतो. या शृंगाराने 'हरी' म्हणजे परमेश्वर सोयरा व्हावा अशी तिची इच्छा आहे. अंतःकरणापासून आवडणा—या त्या श्रीकृष्णास त्याला प्रिय

असणा–या गोष्टींचा अंगीकार मी केला आहे. अशी ती आपल्या सख्यांना आवर्जून सांगते. त्याच्यासाठी 'देह पालटावा' असे तिचे सांगणे आहे.

श्रीकृष्ण हा जीवाचा चैतन्य चोर असल्याचे संत ज्ञानेश्वर गौळणीतून सांगतात. म्हणून त्यांची गौळण म्हणते,

"तुजविण येकली रे कृष्णा न गमे राती ।
तंव तुवां नवल केले वेणू घेऊनि हाती ।
आलिये तेंचि सोय तुझी वोळखिले गती ।।
नवल हे वालभरे कैसें जोडले जिवा ।
दुसरे दुरी ठेले प्रीति केल्या रिघावा ।।
पारु रे पारु रे कान्हा झणे करिसी अव्हेरु ।
तूं तंव हदयीचा होसी चैतन्य चोरु ।
बापरखुमादेविवरा विठो करि कां अंगिकारु ।। "

या गौळणीतील गोपीला श्रीकृष्णाशिवाय चैन पडत नाही. कृष्णाविना एकली असणा–या या गौळणीस 'न गमे राती' असे वाटते. कृष्णाशिवाय रमत नाही. त्याचे वालभ तिच्या जीवास जडले आहे आणि कृष्ण हाच जीवाचा चोर असल्याने त्याने आपला स्वीकार करावा अशी तिची विनवणी आहे. गोपींच्या मनातील विकृती नाहीशी झाली आणि परमेश्वरांशी रतिभाव व्यक्त करताना गोपीची झालेली ही विरह अवस्था आहे.
संत ज्ञानेश्वरांच्या काव्यातील भक्तिभाव सांगणारी ही गौळण म्हणते,

"कोवळे ठुसठुसित मोतियांचे घड । शृंगारिले गुढ जया लेणी ।।
बैसेनिया रथी सुरनर खेळती । देखोनिया पशुपति वेडावले ।।
युक्ति खुंटली वासना निमाली । कळां पै, बैसली पद्मासनी ।।
होय की नव्हे ज्ञानदेव पुसती । आठवितां निवृत्ती भेटी होये ।। "

या ज्ञानेश्वरांच्या गौळणीतून काव्यात्मता जाणवत नाही असा भक्त नाही. अरुपाला रुपवान करण्याचे ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेचे अपूर्व सामर्थ्य या गौळणीतून व्यक्त होते. दिव्यता, प्रकाशमयता, शीतलता, स्निग्धता, प्रसन्नता व कोमलता हया विविध अनुभवांची एकदम प्रचिती या काव्यात आढळते. तर 'कोवळे ठुसठुसित मोतियांचे घड' मध्ये परमात्म स्वरुपाची गुढता आणि त्याच परमात्म्याच्या सगुण रुपाचे सौदर्य, त्याचा गोडवा त्याबद्दल उत्कटत्त्वाने जाणवणारी आत्मीयता हया परस्परविरोधी घटकांच्या बनलेल्या संमिश्र अनुभूतीला हे चरण किती प्रभावीपणे आहे. संत ज्ञानेश्वरांची असामान्य प्रतिभा हया भक्तिभावाने ओलावलेल्या नाटयाला शब्दरुप देताना त्याला एकसारखी विलक्षण काव्यात्म बनवीत असते.

मदनाचा पुतळा असणा–या श्रीकृष्णांवर भक्तिभावाने प्राणपणाने लुब्ध झालेली संत ज्ञानेश्वरांची गौळण म्हणते,

"येणेरुपे पाहावासि तरि असुमाय होसी । माझ्या मना नाकळसी सावळया ।
सगुणपणाची तुझी पडिलेसे मिठी । केली जीवा साटी सावळया ।

वेधला जिऊ माझा सिकवाल काई ।सगुण ठाई वेधियेले ।
ये अंगणी अवचिता देखिला बोलता ।कोण ऐसा निरुता न कळेगे माये ।
सगुण म्हणौनि धरुं गेले पालवी ।तंव नवलपणाची ठेवी प्रगट केली ।
आंतु बाहेरी कांही न कळे वो मज ।आपआपणया चोज वाटोनि ठेलें ।
बापरखुमादेविवरे माझे मी पण चोरुनि नेले ।आपणा ऐसें केले वाईयांवो ।। "

ही गौळण म्हणते की, कृष्णा तुला भक्तिभावाने मनात साठवावेसे वाटते, तर तुमाझ्या मनात मावतही नाहीस. आता त्याच्या सगुणपणाची मीठी पडून त्याला मी चित्तात धरुन ठेवले आहे. या माझ्या अंगणात अवचितपणे दिसलेला आणि बोललेला श्रीकृष्णा खेरीज कोण असणार? तो सगुण असल्याने त्याचा पदर धरला तर त्याने स्वरुप प्रकट केले. आता तर मला आत बाहेर श्रीकृष्णाशिवाय काही दिसत नाही, असे रखुमाईच्या पतीने मीपण चोरुन मला आपणासारखे केले.

अशा श्रीकृष्णमय झालेल्या गौळणीचा हा अनुभव वाचकासही विलक्षण वाटतो. प्रेमाचा लडिवाळ गोडवा दर्शविणारे आहे. अवचितपणे जवळ येणारा, तिला दर्शनाचे आणि संवादाचे सुख देणारा फक्त तोच आहे आणि कोणी काही शिकविले तरी आता काही उपयोग नाही हे तिचे शब्द तिच्या प्रेमातील, भक्तिभावातील विश्वास प्रकट करतात. त्याच्या भक्तिप्रेमाची कास धरल्यानंतर त्याने तिला आपल्यात समाविष्ट केल्याचा तिला येणारा अनुभव हा एक वेगळाच अलौकिक तेज घेऊन येतो. म्हणून ही गौळण सगुणाकडून निर्गुणाकडे वाटचाल करणारी आहे.

संत ज्ञानेश्वरांचे काही स्वतंत्र गौळणीप्रमाणेच शृंगारिक रुपकेही आहेत. "ज्ञानेश्वरांच्या 'पाळणा', 'घोंगडी', 'पाईक', 'हमामा', 'अंबुला', 'विरहिणी', 'सौरी', 'फुगडी' व 'आंधळा' हया नावानी ओळखल्या जाणा–या अभंगानी एकनाथी भारुडांचाच नव्हे तर एकदंर भारुड वाङ्‌मयाचा पाया घातला" असे विचार वसंत जोशी 'ज्ञानदेव–चिंतन' मध्ये मांडतात. ही सर्व रुपके आहेत. विविध भुमिकांचे नाटय ती व्यक्त करीत आहेत व हे नाटय व्यक्त करीत असता श्रेष्ठ दर्जाच्या अध्यात्मानुभवावर प्रकाश टाकीत आहेत.

संत ज्ञानेश्वरांनी 'अंबुला' चे आध्यात्मिक रुपकही भक्तिभावाने रंगविले आहे.

"सगुण अंबुला निर्गुण पै झाला ।
घराचार समस्त बुडविला ।।
आशा हे सासु असतां बुडविला ।
शांति माऊली भेटो आली ।।
रखुमाहेदेविवर विठ्‌ठलेसि चाड ।
अद्वैतेंसि माळ घेऊनि ठेले ।। "

अध्यात्मातील सगुणनिर्गुणाचा बोधही याच रुपकांच्या आधारे संत ज्ञानेश्वर देतात. जो सगुण श्रीकृष्ण परमात्मा तोच माझा निर्गुण पती झाला आणि त्याने माझा सर्व गृहाचार बिघडवून टाकला. मला रात्रंदिवस जाच करणारी सासू जी आशा तीही त्याने नष्ट करुन टाकली आणि शांती माऊली मला भेटण्यास आली. म्हणजेच भक्ताला सतत हाव असणे, आशा असणे म्हणजे

घरातील सासूची भूमिका आणि भक्त शांत, समाधानी असेल तर ते रुप हे श्री विठ्ठलाचे आहे. हा भक्तिभाव यामध्ये आहे. परमात्मभेटीचा दिवस म्हणजे साधु संतांना दिवाळीचा सण वाटतो.

संत ज्ञानेश्वरांच्या गौळणीतील आध्यात्मिक व भक्तिभावाचे रुप प्रारंभी संपूर्ण लौकिकाचे तर अंती लाभलेले वळण पूर्ण पारलौकिकाचे, असे एकाच दोन समान पातळीवरुन साकार होत जाते.

**संदर्भ :**

भिडे बाळकृष्ण अनंत : सार्थ ज्ञानेश्वरी', केशव भिकाजी ढवळे, मुंबई,आवृत्ती बारावी, 1918.

गोसावी र. रा (संपा) : 'श्रीसकलसंतगाथा' भाग – 1, संत ज्ञानेश्वर महाराज सारथी प्रकाशन,पुणे, पुनवर्धित मूल्य आवृत्ती 2000.

जोशी वसंत (संपा): 'ज्ञानदेव–चिंतन',प्राज्ञ प्रकाशन, वाई, आवृत्ती पहिली 1976

जोशी वसंत :'मराठी गौळण', मेहता पब्लिशिंग, पुणे, पहिली आवृत्ती 1988.

पठाण यू.म.:'मध्ययुगीन संतसाहित्य : काही आयाम' स्वरुप प्रकाशन,औरंगाबाद, आवृत्ती पहिली 2003.